# INSTITUTE'S EMBLEM

*Lamp stands for the flame of knowledge to drive away the darkness of ignorance. The atom symbolizes the growth and spread of Science & Technology. The Open book is to remind us of the age old wisdom and scholarship of the saints and teachers based on high morals.*

## Vision

"To promote quality education to produce sensible and accountable Youth."

## Mission

1) To equip the rural students of nation with power of knowledge to face the future challenges to make them responsible citizen of India.
2) To provide an opportunity of high-tech education with economic and social relevance of the region.
3) To generate quality manpower to be absorbed in social, political and economic development of the world.
4) To develop innovative teaching, learning and research to update and upgrade the students with time.
5) To foster global competencies for excellence.

प्रथमत: ज्ञानोपासक परिवारातर्फे आपले हार्दिक अभिनंदन ! Let Noble Thoughts Come to Us From Every Side हे ब्रीदवाक्य उराशी श्रद्धेने जपत १९८४ पासून अखंड ज्ञानाची उपासना करणाऱ्या ज्ञानोपासक महाविद्यालयाने स्वत:ची अशी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर समाजातील सर्वच क्षेत्रात सामाजिक ऋण फेडण्याच्या कृतज्ञतेच्या भावनेतून नित्य धडपडणारे आमचे संस्थाध्यक्ष मा. खा. ॲड. गणेशरावजी दुधगांवकर यांच्या संकल्पनेतील हे ज्ञानोपासक जसे समाजमान्य आहे तसेच ते नुकतेच शासन दरबारी पंचतारांकित म्हणून सिद्ध झाले आहे. विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या वतीने राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषदेच्या विद्यमाने महाविद्यालयाचे सर्वांगीण परीक्षण झाले आणि महाविद्यालयास 'A' हा उच्च दर्जा २०१७ साली प्रदान केला. महाविद्यालयास विद्यापीठाने सन २०११–१२ मध्ये शहरी भागातील शैक्षणिक गौरवाप्रित्यर्थ **उत्कृष्ठ महाविद्यालय** हा पुरस्कार प्रदान केला.

उच्च विद्याविभूषित सुसंस्कृत, तळमळीचा, संशोधन प्रेरीत आणि सतत नाविण्यपूर्ण ज्ञान देण्यासाठी धडपडणारा शिक्षकवृंद व सेवेसाठी तत्पर असणारा कर्मचारी वृंद ह्या पायाभूत अक्षय भांडवलावरच हा पंचतारांकित सन्मान **ज्ञानोपासक** ह्या पंचाक्षरी मंत्राला लाभला आहे. तद्वतच, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने उच्च दर्जाचे शिक्षण घेता यावे, यासाठी महाविद्यालयाने e - Classroom ची व्यवस्था केली आहे.

केवळ अध्ययन–अध्यापन एवढीच भूमिका स्वीकारून हे महाविद्यालय कार्यरत नाही तर सुसंस्कृत, समाजपयोगी, स्वयंशासित, स्वयंप्रेरित, स्वावलंबी व परिपूर्ण माणूस घडावा ह्या अंत: प्रेरणेने या महाविद्यालयाचे दैनंदिन कार्य चालते. या सर्वाचा निष्कर्ष व गुणवत्तेची दाद म्हणून २००६–०७ या शैक्षणिक वर्षापासून २००९–१० व पुढे २०१०–११ ते २०१५–१६ आणि आता २०१५–१६ ते २०१९–२० पर्यंत या महाविद्यालयास विश्वविद्यालय अनुदान आयोगाने College with Potential for Excellence हा बहुमान सलग तिसऱ्यांदा प्रदान केलेला आहे. **महाविद्यालयास नुकताच रुसा (RUSA) कडून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.** अशा महाविद्यालयात आपण प्रवेश घेत आहात ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे तथापि, आपण बहुआयामी व आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तोडीचे व्हावे ह्यासाठी आपण जागरूक असावे एवढीच अपेक्षा आपणांकडून ठेवते.

पुन:श्च एकदा आपले सहर्ष हार्दिक अभिनंदन आणि महाविद्यालयात स्वागत.

**प्रा.डॉ.शेख मो. बाबर**
**प्र. प्राचार्य**

# अनुक्रमणिका


१. महाविद्यालयाबद्दल ............ ०५

२. विद्याशाखा ............ ०५

३. प्रवेश नियम ............ ०६

   ३.१ कला शाखा ............ ०७

   ३.२ वाणिज्य शाखा ............ ०७

   ३.३ विज्ञान शाखा ............ ०८

   ३.४ द्विलक्षी अभ्यासक्रम ............ ०८

   ३.५ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम ............ ०९

४. शुल्क विवरण ............ १०

   ४.१ पूर्ण शुल्क ............ १०

   ४.२ ई.बी.सी. शुल्क ............ १०

   ४.३ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शुल्क ............ ११

५. सूचना ............ १२

६. महाविद्यालयांतर्गत परीक्षा ............ १२

७. विद्यार्थ्यांकरीता आचारसंहिता ............ १३

८. ग्रंथालय ............ १४

९. क्रीडा विभाग व इतर सुविधा ............ १५

१०. अन्य उपक्रम / विस्तारीत कार्यक्रम ............ १६

११. शिष्यवृत्ती व सवलती ............ १७

१२. पारितोषिके ............ १७

१३. शिक्षकवृंद ............ १८

१४. शिक्षकेत्तर कर्मचारी ............ २०

१५. महाविद्यालयीन विविध उपक्रम ............ २२

## ०१. महाविद्यालयाबद्दल ...

आजच्या प्रगमनशील वैज्ञानिक युगातील स्पर्धेच्या युगात आपला विद्यार्थी सर्वार्थाने टिकण्यास पात्र व्हावा, त्याच्या ठाई असलेल्या चैतन्याचा पूर्ण स्वरूपात विकास व्हावा तो खऱ्या अर्थाने 'ज्ञानोपासक' व्हावा आणि माणूस म्हणून घडला जावा या शुद्ध हेतू पोटी १९८४ पासून परभणी जिल्ह्यातील ज्ञानोपासक ही आपलीच संस्था ज्ञान दानाचे पवित्र कार्य निष्ठेने व प्रामाणिकपणे करीत आहे. शिक्षण हाच समाजाच्या उन्नतीचा एकमेव मार्ग असून ज्या समाजात आपला जन्म झाला आहे, त्या समाजाचा व देशाचा उद्धार करण्याच्या आपल्या नैतिक कर्तव्याची जाण असणाऱ्या माननीय माजी खा.ॲड. गणेशरावजी दुधगावकरांच्या समर्थ व सक्षम नेतृत्वाखाली ज्ञानोपासक संस्थेतील एक घटक म्हणून काम करताना विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांना मिळणारे आत्मिक समाधान ही संस्थेनी कमावलेली लक्षणीय उपलब्धी होय.

परभणी जिल्ह्याच्या शैक्षणिक मागासलेपणाचा अनुशेष भरून काढण्यास ज्ञानोपासकचा सिंहाचा वाटा असून जिंतूर आणि परभणी येथील सर्व सुविधा, परिपूर्ण व सुसज्ज भव्य इमारती, तज्ञ व निष्णात अध्यापक वर्ग आणि सेवाभावी कर्मचारी असणारी महाविद्यालये, ग्रामीण भागात असणारी माध्यमिक विद्यालये आणि परभणी येथील बी.पी.एड. महाविद्यालय, अध्यापक विद्यालय ही त्यांची साक्ष पटवितात. परभणी येथील महाविद्यालयाने स्वकर्तृत्वावर आणि गुणवत्तेवर स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त होऊ शकेल अशी पात्रता संपादन केली आहे व प्रत्यक्षात ही संकल्पना साकार होत आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्य कक्षेत सर्वाधिक विषयाच्या पदव्युत्तर शिक्षणाची सोय असणारे हे एकमेव महाविद्यालय असून चारित्र्य संपन्न, गुणवंत आणि जबाबदार नागरीक म्हणून विद्यार्थी घडविताना येथील सर्वच घटकांना अभिमान वाटतो. अशा या परिपूर्ण आपल्याच ज्ञानोपासक महाविद्यालयात आणि परिवारात सहभागी होणाऱ्या तमाम पाल्यांचे आणि त्यांच्या पालकांचे हार्दिक स्वागत.

## ०२. विद्या शाखा :

परभणी जिल्ह्याचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन ज्ञानोपासक शिक्षण मंडळाने १९८४ पासून परभणी येथे कला, वाणिज्य व विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातर्गत कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यात आली. ११वी विज्ञान वर्गासाठी क्रॉप सायन्स, संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स या द्विलक्षी अभ्यासक्रमाची सोय अनेक वर्षापासुन उपलब्ध आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात माहिती तंत्रज्ञान (I.T.) ह्या विषयाची गरज लक्षात घेऊन सर्व शाखेसाठी हा विषय उपलब्ध आहे. सर्व शाखेच्या नियमित तासिका होतातच ही ज्ञानोपासक महाविद्यालयाची ओळख जिल्ह्यात सर्वत्र निर्माण झाली आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धांचे आयोजन प्रतीवर्षी केल्या जाते.

## ०३. प्रवेश नियम :

०१) महाविद्यालयात इयत्ता ११वी साठी प्रवेश घेण्यासाठी शालांत परीक्षा उत्तीर्ण व इयत्ता १२वी प्रवेशासाठी तत्सम विद्याशाखेत इयत्ता ११वी उत्तीर्ण.

०२) प्रवेश घेण्यासाठी विहीत नमुन्यातील 'प्रवेश नोंदणी अर्ज' आवश्यक त्या प्रमाणित सत्यप्रतीसह व प्राचार्यांच्या अनुमती दर्शक स्वाक्षरीने कार्यालयात जमा करावा.

०३) प्रवेश अर्जासोबत खालील मूळ प्रमाणपत्रे व प्रत्येकी दोन सत्यप्रती सादर कराव्यात.

अ) गुणपत्रिका
ब) शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला.
क) उत्पन्नाचा दाखला
ड) जातीचे प्रमाणपत्र
इ) स्थलांतर प्रमाणपत्र
फ) **आधार कार्ड (सत्यप्रत)**

०४) 'प्रवेश–नोंदणी–अर्ज' जमा झाल्यानंतर शासनाच्या गुणानुक्रम व आरक्षण नियमानुसार पात्र विद्यार्थ्यांची यादी आणि प्रतिक्षा यादी फलकावर लावण्यात येईल.

प्रवेश यादीवरील तारखेनुसार प्रत्यक्ष हजर राहून मुळ कागदपत्रे व निर्धारित शुल्क देवून प्रवेश निश्चित करावा.

०५) मुख्य यादीतील विद्यार्थ्यांना दिलेल्या मुदतीत प्रवेश घ्यावा लागेल. त्या मुदतीनंतर प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

०६) महाराष्ट्राबाहेरील माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी स्थलांतराचा दाखला प्रवेश घेतल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावा.

०७) त्याच वर्गात पुनः प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संपूर्ण वार्षिक शुल्क प्रवेश घेते वेळी भरावे लागेल.

०८) कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास तशा आशयाचा लेखी अर्ज प्राचार्यांच्या नावे कार्यालयात सादर करावा. प्रवेश रद्द करते वेळी विद्यार्थ्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

०९) प्रवेश होण्यापूर्वी महाविद्यालयातील सर्वच नियमांचा व संहितेचा अभ्यास करून योग्य विषयाची निवड करून व प्रवेश–अर्जावर पालकांची स्वाक्षरी घेवूनच प्रवेश घ्यावा.

१०) या महाविद्यालयात मिळणारा प्रवेश प्रारंभी तात्पुरता असून शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्या नियम व आदेशानुसार विद्यार्थी अपात्र ठरला असल्यास प्रवेश रद्द केल्या जाईल व तसे विद्यार्थ्यास कळविले जाईल. अशा प्रकारच्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी व्यक्तीशः जबाबदार राहील.

११) **महाविद्यालयात मूळ प्रमाणपत्रे देण्याअगोदर विद्यार्थ्यांनी स्वतःकडे झेरॉक्स प्रती ठेवणे अनिवार्य आहे. पुन्हा झेरॉक्स प्रतिसाठी अर्ज करु नये.** प्रवेश रद्द केल्याशिवाय टि.सी. व मार्कस् मेमो ची मुळ प्रत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

१२) ज्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे त्यांनी मूळ प्रमाण पत्रासोबत **आधारकार्डची सत्यप्रत द्यावी.**

## ३.१ कला शाखा

### ०१) प्रवेश पात्रता

इयत्ता ११ वी : इयत्ता १०वी (शालांत परीक्षा) उत्तीर्ण

इयत्ता १२ वी : मान्यता प्राप्त शाळा / महाविद्यालयातील इयत्ता ११वी ची परीक्षा उत्तीर्ण.
अन्य राज्यातील विद्यार्थ्यांसाठी +२ स्तरावरील प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण.

### ०२) विषय

अनिवार्य विषय : इंग्रजी
द्वितीय भाषा : मराठी/हिंदी/उर्दू/संस्कृत (पैकी एक)

**ऐच्छिक विषय :**

गट क्र. १ : राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र किंवा सहकार, अर्थशास्त्र किंवा मानसशास्त्र

## ३.२ वाणिज्य शाखा :

### ०१) प्रवेश पात्रता

इयत्ता ११ वी : इयत्ता १०वी (शालांत परीक्षा) उत्तीर्ण
इयत्ता १२ वी : मान्यताप्राप्त शाळा/महाविद्यालयातील इयत्ता ११ वीची परीक्षा उत्तीर्ण.
अन्य राज्यातील विद्यार्थ्यांसाठी +२ स्तरावरील प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण.

### ०२) विषय

अनिवार्य विषय : इंग्रजी
द्वितीय भाषा : मराठी/हिंदी/उर्दू/संस्कृत/माहिती तंत्रज्ञान (I.T.) (पैकी एक)

**ऐच्छिक विषय :**

१) पुस्तपालन व लेखाकर्म
२) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन
३) अर्थशास्त्र
४) सचिवाची कार्यपद्धती किंवा सहकार

## ३.३ विज्ञान शाखा

### ०१) प्रवेश पात्रता

इयत्ता ११ वी : इयत्ता १०वी (शालांत परीक्षा) उत्तीर्ण

इयत्ता १२ वी : मान्यता प्राप्त शाळा/महाविद्यालयातील इयत्ता ११ वीची परीक्षा उत्तीर्ण.
अन्य राज्यातील विद्यार्थ्यांसाठी +२ स्तरावरील प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण.

### ०२) विषय

अनिवार्य विषय : इंग्रजी

द्वितीय भाषा : मराठी/हिंदी/उर्दू/संस्कृत/माहिती तंत्रज्ञान (I.T.) (पैकी एक)

**ऐच्छिक विषय:**

१) पदार्थ विज्ञान (Physics)

२) रसायनशास्त्र (Chemistry)

३) जीवशास्त्र (Biology) OR **संगणकशास्त्र (Bifocal) (Computer Science)** / **इलेक्ट्रॉनिक्स (Bifocal) (Electronics)**

४) गणित (Maths) **OR** कृषि विज्ञान व तंत्रज्ञान Crop Production OR भूगर्भशास्त्र (Geol.) OR मानसशास्त्र (Psychology) OR **पीक शास्त्र (Crop. Sci.)**

## ३.४ द्विलक्षी अभ्यासक्रम (Bifocal) – संगणकशास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/पीक शास्त्र (यांपैकी एक)

हा अभ्यासक्रम घेणाऱ्यास द्वितीय भाषेची सुट मिळते.

### ०१) संगणकशास्त्र (Computer Science) माध्यम : इंग्रजी

**Subject 1 : Junior Software Developer**
**Subject 2 : Field Technician - Computing & Peripherals**

### ०२) इलेक्ट्रॉनिक्स (Electronics) माध्यम : इंग्रजी

**Subject 1 : Field Technician - Computing & Peripherals**
**Subject 2 : Field Technician - Washing Machine**

संगणकशास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स हे विषय रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व गणित विषयांबरोबर घेता येतील.

### ०३) पीक शास्त्र (Crop Science) माध्यम : इंग्रजी

**Subject 1 : Organic Grower**
**Subject 2 : Irrigation Service Technician**

हा विषय रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र विषयांबरोबर घेता येईल.

टिप : **प्रत्येक विषय हा २०० मार्कांचा असेल.**

## ३.५ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational) :

व्यावसायिक शिक्षण ही काळाजी गरज सिद्ध झाली असून किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची अधिक दोन स्तरावर निर्मिती करण्यात आली आहे. ह्या अभ्यासक्रमात ७०% भर प्रात्यक्षिकावर आहे. महाविद्यालयात हा अभ्यासक्रम नियमितपणे व अधिक प्रभावीपणे शिकविला जातो. ज्याचा लाभ विद्यार्थी अधिक प्रमाणात घेतात. रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधी त्यातून मिळत असल्याने ह्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा अधिक आहे.

**०१) प्रवेश पात्रता**

इयत्ता ११ वी : इयत्ता १० वी (शालांत परीक्षा) उत्तीर्ण

इयत्ता १२ वी : इयत्ता ११ वी (H.S.C. VOC.) ची परीक्षा उत्तीर्ण.

(कि.कौ. आधारित अभ्यासक्रमातील विषयानुसारच प्रवेश घेता येईल.)

**०२) अभ्यासक्रम (विषय)**

किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत खालील विषयांचे अध्यापन केले जाते.

१) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (Electronics Technology) – ३० जागा

२) पीकशास्त्र (Crop Science) – ४० जागा

३) मार्केटींग व रिटेल मॅनेजमेंट (Marketing & Retail Management) – ४० जागा

**अनिवार्य विषय :**

१) इंग्रजी

२) पायाभूत अभ्यासक्रम (General Foundation) हे विषय अनिवार्य असतील.

**ऐच्छिक विषय :**

द्वितीय भाषा : हिंदी किंवा मराठी (पैकी एक)

मुख्य विषय : उरलेले तीन विषय हे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे असून प्रत्येक विषय २०० गुणांचा (१२० गुण प्रात्यक्षिक परीक्षेला व ८० गुण लेखी परीक्षेला) राहील.

**वैशिष्ट्ये :**

❖ प्रत्येक विषयासाठी मर्यादित जागा असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष देऊन स्वयंरोजगारासाठी योग्य मार्गदर्शन केले जाते. ❖ शासनातर्फे शिकाऊ उमेदवारी योजनेचा लाभ विद्यार्थी घेऊ शकतात. ❖ शासनातर्फे स्वयंरोजगारासाठी मदत केली जाते. ❖ **इ. १२वी उत्तीर्ण झाल्यानंतर बी.ए. अथवा बी.कॉम. व बी.सी.ए. प्रथम वर्षात प्रवेश मिळण्यास विद्यार्थी पात्र.** ❖ **इलेक्ट्रॉनिक विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी (Polytechnic) पदविका द्वितीय वर्षास प्रवेशास पात्र असतील. तसेच बी.एस.सी. (Electronics) प्रथम वर्षास प्रवेश.** ❖ महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील कृषी सहाय्यक पदाकरिता इ. १२ वी (पीकशास्त्र) ही पात्रता मान्य करण्यात आली असल्याने विद्यार्थ्यांना त्या पदाकरिता नोकरीची संधी प्राप्त आहे. ❖ अपंग विद्यार्थ्यांला भाषा विषयासाठी सवलत.

## ०४. शुल्क विवरण

### ४.१ पूर्ण शुल्कअदा करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता

| अ.क्र. | विवरण | अकरावी | | बारावी | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला/वाणिज्य | विज्ञान | कला/वाणिज्य | विज्ञान |
| १. | शैक्षणिक शुल्क | १९२ | १९२ | २१६ | २१६ |
| २. | प्रवेश शुल्क | १६ | १६ | १८ | १८ |
| ३. | सत्र शुल्क (एकत्रित) | ३२ | ३२ | ३६ | ३६ |
| ४. | प्रयोगशाळा शुल्क | -- | ७० | -- | ७० |
| ५. | महाविद्यालयीन शुल्क | ४२५ | ५२५ | ३७५ | ४७५ |
| ६. | वार्षिकांक | १५ | १५ | १५ | १५ |
| ७. | विमा | ०५ | ०५ | ०५ | ०५ |
| ८. | इतर | २०० | २०० | २०० | २०० |
| | **एकूण** | **८८५** | **१०५५** | **८६५** | **१०३५** |

टीप : १) माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी रू.१२५०/- एवढे शुल्क आहे.
२) इंटरनेट सेवा रू.१००/-, ई-सुविधा रू.५०/-

### ४.२ ई. बी. सी. सवलतधारक विद्यार्थ्यांकरीता

| अ.क्र. | विवरण | अकरावी | | बारावी | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला/वाणिज्य | विज्ञान | कला/वाणिज्य | विज्ञान |
| १. | ग्रंथालय शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| २. | महा.परीक्षा शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| ३. | स्नेहसंमेलन शुल्क | ४० | ४० | ४० | ४० |
| ४. | विकास निधी | २० | २० | २० | २० |
| ५. | विद्यार्थी सहाय निधी | १० | १० | १० | १० |
| ६. | प्रयोगशाळा अनामत | -- | १०० | -- | १०० |
| ७. | ग्रंथालय अनामत | ५० | ५० | -- | -- |
| ८. | विमा | ०५ | ०५ | ०५ | ०५ |
| ९. | इतर | २०० | २०० | २०० | २०० |
| | **एकूण** | **६२५** | **७२५** | **५७५** | **६७५** |

टीप : १) माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी रू.१२५०/- एवढे शुल्क आहे.
२) ई.बी.सी. सवलतधारक विद्यार्थ्यांकरीता पालकाच्या उत्पन्नाची मर्यादा रू.१,००,०००/- पेक्षा जास्त नसावी. (उत्पन्नाचे प्रमाणपत्र सरपंच/विशेष कार्यकारी दंडधिकारी यांचे आवश्यक)
३) इंटरनेट सेवा रू.१००/-, ई-सुविधा रू.५०/-
४) ११वी व १२वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा व शारिरीक शिक्षण शुल्क रू.२५/- एवढे अतिरिक्त द्यावे लागेल.

## ४.३ उच्च माध्यमिक व व्यवसाय अभ्यासक्रमाचे शुल्क विवरण :

### ४.३.१ पूर्ण शुल्क अदा करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता

| अ.क्र. | विवरण | अकरावी | बारावी |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक शुल्क | २४० | ३०० |
| २. | प्रवेश शुल्क | २० | -- |
| ३. | सत्र शुल्क (एकत्रित) | ४० | ५० |
| ४. | प्रयोगशाळा शुल्क | ८० | १०० |
| ५. | महाविद्यालयीन शुल्क | २९० | २९० |
| ६. | वार्षिकांक | १५ | १५ |
| ७. | विमा | ०५ | ०५ |
| ८. | संस्था विकास निधी | २०० | २०० |
| | **एकूण** | **८९०** | **९६०** |

### ४.३.२ ई. बी. सी. सवलतधारक विद्यार्थ्यांकरीता

| अ.क्र. | विवरण | अकरावी | बारावी |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथालय शुल्क | १५ | १५ |
| २. | महा.परीक्षा शुल्क | ८० | ८० |
| ३. | स्नेहसंमेलन शुल्क | १० | १० |
| ४. | प्रयोगशाळा शुल्क | २० | २० |
| ५. | विद्यार्थी सहाय निधी | १० | १० |
| ६. | ग्रंथालय अनामत | ५० | ५० |
| ७. | विमा | ०५ | ०५ |
| ८. | संस्था विकास निधी | २०० | २०० |
| | **एकूण** | **३९०** | **३९०** |

टीप : १) ई.बी.सी. सवलतधारक विद्यार्थ्यांकरीता पालकाच्या उत्पन्नाची मर्यादा रू.१,००,०००/- पेक्षा जास्त नसावी. (उत्पन्नाचे प्रमाणपत्र सरपंच/विशेष कार्यकारी दंडधिकारी यांचे आवश्यक)

२) इंटरनेट सेवा रू.१००/-, ई-सुविधा रू.५०/-

३) क्रिडा व शारिरीक शिक्षण शुल्क रू.२५/- एवढे अतिरिक्त द्यावे लागेल.

## ०५. सूचना

१) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज नीट व सुवाच्च अक्षरात भरावे. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो सादर करावेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी तीन फोटो सादर करावेत. प्रवेश अर्ज इंग्रजी भाषेत भरावेत. (संपूर्ण नाव इंग्रजी भाषेमध्ये असावे)

२) प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी ओळखपत्र शुल्क ग्रंथालयात भरून ओळखपत्र घ्यावे.

३) जर काही कारणास्तव विषय अथवा विद्याशाखा बदलून घेण्यासाठी, विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयातून घ्यावा. त्यावर संबंधित प्राध्यापकाची अनुमतीदर्शक स्वाक्षरी घेवून प्राचार्यांची स्वाक्षरी घेवून बदलाची योग्य कार्यवाही होईल. अशा प्रकारच्या बदलाची सवलत एकदाच मिळेल. त्यासाठी रू. ५०/– शुल्क आकारण्यात येईल.

४) एकदा आकारलेले शुल्क कुठल्याही सबबीवर परत केले जाणार नाही.

५) विद्यार्थ्यांनी अनामत रक्कम शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत मूळ पावती व ओळखपत्र दाखवून परत घ्यावी.

**६) वाहनधारक विद्यार्थ्यांनी वाहनशुल्क कार्यालयात भरावे. याशिवाय वाहनांची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही. वाहने वाहनतळावर शिस्तीने ठेवावीत अन्यथा कडक कार्यवाही करण्यात येईल.**

७) **गणवेश – सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने ठरवून दिलेला गणवेश अनिवार्य आहे. उपरोक्त गणवेशाचे कापड महाविद्यालयातील विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारात उपलब्ध आहे.**

८) या पुस्तिकेतील विद्यार्थी–आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

९) जे विद्यार्थी महाविद्यालयात वाहन आणतात अशा वाहनांचा विमा उतरविलेला असणे आवश्यक आहे.

१०) प्रवेश अर्जासह आधार कार्डची झेरॉक्स प्रत सादर करावी.

११) **विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना बायोमेट्रीक उपस्थिती अनिवार्य आहे.**

## ०६. महाविद्यालयांतर्गत परीक्षा

११वी इयत्तेसाठी महाविद्यालयातर्फे दोन घटक चाचणी परीक्षा, प्रथम सत्र परीक्षा व वार्षिक परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेत पास होण्यासाठी प्रत्येक विषयात सरासरी ३५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. इयत्ता ११वीच्या सर्व विद्या शाखांचा वार्षिक निकाल अ) अंतर्गत चाचण्या ब) महाविद्यालयीन प्रथम सत्र परीक्षा क) वार्षिक परीक्षा यांचे गुण लक्षात घेऊन या गुणांच्या सरासरीच्या आधारे लावण्यात येईल.

महाविद्यालयातर्फे १२वी इयत्तेची प्रत्येक रविवारी एका विषयाची चाचणी परीक्षा घेण्यात येईल. डिसेंबर व जानेवारी महिन्यामध्ये एकूण तीन सराव परीक्षा घेण्यात येतील. सदरील परीक्षा अनिवार्य असून **परीक्षा न देणाऱ्या व वर्गात उपस्थित नसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी विषयक सवलती प्राचार्य रद्द करतील. तसेच दंडात्मक कार्यवाही केली जाईल.** १२वी गुणवत्तावाढीसाठी घेण्यात येणाऱ्या जादा तासिकेस विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. सुट्टीमध्ये घेण्यात येणाऱ्या गुणवत्ता वाढ प्रकल्प, विविध परीक्षेचा सराव इ. शैक्षणिक उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. **१२वी (कला, वाणिज्य, विज्ञान) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

## ०७. विद्यार्थ्यांकरीता आचारसंहिता

१) महाविद्यालयाच्या परिसरामध्ये तसेच परिसराबाहेर विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे. शांतता राखणे व स्वतःची वर्तणूक योग्यप्रकारे ठेवणे.

२) **महाविद्यालयाच्या परिसरात वावरतांना स्वतःचे ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक आहे व मागणी केल्यास सादर करणे अनिवार्य आहे.**

३) तासिका व प्रात्यक्षिकांना सतत गैरहजर राहणे, वर्गात व प्रयोगशाळेत संबंधित प्राध्यापकांच्या पूर्व परवानगीशिवाय वर्गात येणे जाणे हे वर्तन बेशिस्तीचे मानले जाईल. **७५ टक्के उपस्थिती** असल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही.

४) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वर्तणुकीने महाविद्यालयाच्या नावलौकिकास धक्का पोहचेल असे वर्तन न करणे.

५) महाविद्यालयीन कामकाजात विद्यार्थ्यांनी स्वतः किंवा इतराच्या मदतीने अडथळा न आणणे.

६) खोटी किंवा बनावट कागदपत्र दाखल करून प्रवेश घेणे तसेच शासकीय सवलतीचा गैरफायदा घेणे हे कृत्य गुन्ह्यास पात्र आहे.

७) महाविद्यालयातील इतर विद्यार्थी/विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्रास देणे, चिडवणे, टिंगल करणे तसेच त्यांचा अपमान करणे हा गुन्हा आहे.

८) महाविद्यालयीन मालमत्तेचे व कार्यालयीन कागदपत्राचे नुकसान करणे, तसेच महाविद्यालयीन परिसरामध्ये प्राणघातक शस्त्रे, स्फोटक पदार्थ, शरीराला अपायकारक ठरणाऱ्या वस्तू विषारी पदार्थ आणि मोबाईल फोन आणण्यास बंदी आहे.

९) महाविद्यालयासंबंधी प्राचार्यांच्या पूर्वपरवागनीशिवाय वृत्तपत्राकडे धाव घेणे, महाविद्यालयीन परिसरामध्ये विद्यार्थ्यांच्या गटास संबोधून भाषण करणे, संप, दंगा, घेराव, धरणे व बंद करण्यास चिथावणी देणे, कुठल्याही संघटनेत भाग घेणे गुन्ह्यास पात्र ठरेल.

१०) महाविद्यालयातील प्रत्येक वर्गाचा प्रतिनिधी हा त्या वर्गातील गुणानुक्रमे प्रथम असणारा विद्यार्थी नियुक्त केला जाईल अशा नियुक्त केलेल्या वर्गप्रतिनिधीतून विद्यार्थी संसद होईल.

११) वरील नियमा व्यतिरिक्त महाविद्यालयीन परिसरात गैरवर्तणूक व बेशिस्त आढळून आल्यास प्राचार्यास योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार राहील.

१२) विद्यार्थ्यांनी रिकाम्या वेळेत वाचन कक्षातच बसावे. महाविद्यालयाच्या प्रांगणात भटकु नये.

## ०८. ग्रंथालय

ज्ञानोपासक महाविद्यालय हे स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठातील एक अग्रगण्य महाविद्यालय आहे. महाविद्यालयात इयत्ता अकरावी ते पदव्यूत्तर स्तरावर अभ्यासक्रम चालतात. येथे मोठ्या प्रमाणावर संशोधनही चालते त्यामूळे या सर्व बाबींचा विचार करून आमचे ग्रंथालय दर्जेदार बनवलेले आहे. ग्रंथालयात संशोधनात्मक स्पर्धापरिक्षा, नेट/सेट इ. डोळ्यासमोर ठेवून ग्रंथाचे संकलन केलेले आहे. ग्रंथालयात दर्जेदार क्रमिक व संदर्भ ग्रंथाचा समावेश आहे. स्पर्धापरिक्षा व संशोधनासाठी लागणारे नियतकालीके, पाक्षिके, मासिके इत्यादी ज्ञानवर्धक साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

ग्रंथालयाचे बारकोडसह संपूर्ण संगणकीकरण करण्यात आलेले असून त्यासाठी SOUL 2.0 हे सॉफ्टवेअर वापरण्यात आले आहे. ग्रंथ देवघेवसाठी SMS Alert सुविधा उपलब्ध आहे. ग्रंथालय हे रेलटेल लिजलाईनने जोडलेले आहे, त्यामूळे वाचकांना कोणतीही माहिती तात्काळ उपलब्ध होईल.

Online ग्रंथ व नियतकालीके पाहण्यासाठी UCG Inflibnet N-List Pragramme व DELNET लिंकची सुविधा उपलब्ध आहे. त्याचे संकेतस्थळ http://nlist.inflibnet.ac.in व http://delnet.nic.in आहेत.

**उपलब्ध सुविधा व सेवा :**

● सुसज्ज व भव्य वाचन कक्ष ● इंटरनेट कक्ष ● Online ग्रंथ व नियतकालीके पाहाण्यासाठी UGC Inflibnet – List Programme व DELNET लिंकची सुविधा ● ग्रंथालयातील उपलब्ध पुस्तके पाहाण्यासाठी Online OPAC ची सुविधा ● प्रतिलिपी सेवा ● बुक बँक सेवा ● आंतर ग्रंथालय देवघेव सेवा ● वर्तमानपत्र कात्रण सेवा ● संदर्भ सेवा ● मागील परिक्षांचे प्रश्नसंच ● पॉवर बॅकअप सेवा ● संगणक आणि छपाई सेवा ● प्रचलित जागरूकता सेवा ● निवडक माहिती प्रसारण सेवा ● SMS सेवा ● E-Library सेवा ● मुक्तद्वार पद्धत ● New Arrivals Display सेवा

**१०.१ सर्वसाधारण नियम**

अ) विद्यार्थ्यांस एका आठवड्या पेक्षा जास्त कालावधीसाठी पुस्तक हवे असल्यास परवानगी घेणे आवश्यक आहे.

ब) पुस्तकांना कोणत्याही प्रकारची क्षती पोहचू नये याची काळजी घ्यावी. उदा. पानाचे कोपरे दुमडणे,कोणताही मजकुर पेनने अथवा पेन्सिलने अधोरेखित करणे, पाने फाडणे/काढून घेणे इ.

क) पुस्तकास क्षती पोहचल्यास त्या पुस्तकाची दुप्पट किंमत वसुल करण्यात येईल किंवा नवीन पुस्तक घेण्यात येईल.

ड) विद्यार्थ्यांनी पुस्तक घेण्यापुर्वीच पुस्तक चांगल्या स्थितीत आहे याची खातरजमा करून घ्यावी.

**वाचनकक्ष** : महाविद्यालयामध्ये सुसज्ञ वाचनकक्ष उपलब्ध असून त्यामध्ये सर्व नियतकालिके, साप्ताहिके, दैनिके, पाक्षिके, मासिके इत्यादी ज्ञानवर्धक साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

## ०९. क्रीडा विभाग :

विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण व्हावी व शारीरिक विकास व्हावा यासाठी महाविद्यालयात क्रीडा विभाग अस्तित्वात असून यामार्फत विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. विविध खेळांचा सराव दररोज मैदानावर घेतल्या जातो.

विषेश बाब : **आत्तापर्यंत प्रतीवर्ष कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी तालुका, जिल्हा विभाग व राज्य स्तरावर पारितोषिके मिळवली आहेत.**

## १०. मुलींचे वसतीगृह :

महाविद्यालयाने यु.जी.सी. च्या सहकार्याने मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची व्यवस्था केलेली आहे. मुलींनी वसतीगृहात प्रवेश घ्यावा. प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

## ११. उपहार गृह :

महाविद्यालयात प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र व्यवस्था असलेले उपहारगृह उपलब्ध आहे. **विद्यार्थ्यांनी उपहारगृहात शैक्षणिक कामकाज टाळून बसू नये.**

## १२. ज्ञानोपासक वार्षिकांक :

विद्यार्थ्यातील लेखन गुणांची वाढ करण्यासाठी महाविद्यालयातर्फे 'ज्ञानोपासक' या वार्षिकांकाचे प्रकाशन केले जाते. या अंकात विद्यार्थ्यांच्या लेखन विचारसरणीला प्रसिद्धी दिली जाते तसेच महाविद्यालयाचा वार्षिक कार्याचा आढावा घेण्यात येवून गुणवंत विद्यार्थ्यांची दखल घेतली जाते.

## १३. वैद्यकीय सोयी व सुविधा :

विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय सोयी–सुविधा व प्रथमोपचार महाविद्यालयात उपलब्ध आहे.

## १४. विविध उपक्रम :

कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर सामान्यज्ञान परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चित्रकला व संगीत स्पर्धा प्राधान्याने आयोजित केल्या जातात.

## १५. शैक्षणिक सहल :

शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट आयोजित करुन विद्यार्थ्यांच्या अनौपचारिक शिक्षणास प्रोत्साहन दिल्या जाते.

## १४. अन्य उपक्रम / विस्तारित कार्यक्रम

या महाविद्यालयाने शैक्षणिक प्रगतीसोबतच समाजाभिमुख विविध उपक्रम राबविण्याचा मानस धरून अनेकविध उपक्रम सुरू केलेले आहेत. त्यामार्फत विविध शिक्षण, सामान्यज्ञान, समाजापर्यंत पोहचवून समाजातील अडचणी समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **१४.१ व्यायाम शाळा :** महाविद्यालयाच्या क्रीडा विभागात अत्याधुनिक 'मल्टीजीम–मशीन' व इतर व्यायाम साहित्यांनीयुक्त अशी परिपूर्ण व्यायामशाळा विद्यार्थ्यांच्या बलोपासनेसाठी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
- **१४.२ ज्ञानोपासक विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार :** 'विना सहकार, नाही उद्धार' हा हेतू समोर ठेवून ग्राहक भांडाराची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध दैनंदिन, जीवनावश्यक वस्तू व महाविद्यालय उपयोगी साहित्य इत्यादी उच्च दर्जाच्या वस्तू रास्त दरात या भांडारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. परभणी जिल्ह्यात सहकारी तत्वावर सुरू असलेले हे पहिलेच यशस्वी विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार आहे.
- **१४.३ शैक्षणिक प्रकाशने :** शैक्षणिक साहित्याचे, 'शब्दगंध', 'शब्दवेध', 'ज्ञान रिपोर्टर', 'बायो व्हिज्युल', 'बायोकेम', 'नो अवर प्लॅनेट', हिंदी जगत, वाणिज्य वार्ता, अशा विविध भित्तीपत्रकाचे व इतर शैक्षणिक साहित्याचे नियमित प्रकाशन होते तसेच 'ज्ञानोपासक' या महाविद्यालयीन वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात येते.
- **१४.४ राष्ट्रीय सेवा योजना :** महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकास मान्यता आहे. राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत ग्रामीण परिसरात व परभणी शहरात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. प्रासंगिक समाज उपयोगी उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा अग्रणी सहभाग असतो. **प्रा. मनवर आर.एम.** हे कार्यक्रमाधिकारी आहेत.
- **१४.५ वैद्यकीय प्रवेश पात्रता परीक्षा (वैद्यकीय/अभियांत्रिकी) (NEET/JEE) :** महाविद्यालयाने मार्च २००२ पासून वैद्यकीय पात्रता परीक्षेच्या तयारीसाठी स्वतंत्र वाचनकक्ष सुरू केले असून यामध्ये १८ विविध प्रकाशकांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. संबंधित परीक्षेचे तास महाविद्यालयात नियमित घेतल्या जातात.

## १५. शिष्यवृत्ती व सवलती :

कनिष्ठ महाविद्यालयातील प्रविष्ठ विद्यार्थी गुणवत्ता व योग्य पात्रते नुसार पुढील शिष्यवृत्तीसाठी पात्र होऊ शकतात. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची एक प्रत महाविद्यालयात सादर करावी.

१) भारत सरकर शिष्यवृत्ती (GOI).

२) केंद्रशासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (अल्पसंख्यांक समाजातील मुस्लिम, शीख, पारशी, ख्रिश्चन व बौद्ध) जातीच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती योजना नव्यानेच सन २००७–२००८ पासून चालू करण्यात आलेली आहे.

३) शासकीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (Govt. open merit).

४) प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती.

५) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती.

६) अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती.

७) प्राथमिक शिक्षकांच्या मुला–मुलींना शैक्षणिक सवलत.

८) आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती.

९) अहिंदी भाषिक प्रांतातील विद्यार्थ्याना दिली जाणारी शिष्यवृत्ती.

१०) राष्ट्रीय शिष्यवृत्ती.

११) महाविद्यालयीन गुणवत्ता शिष्यवृत्ती.

१२) शारीरिक दृष्ट्या अपंग असल्यास विद्यार्थी–विद्यार्थीनीला शिष्यवृत्ती.

**सूचना :**

१) शिष्यवृत्ती क्रमांक १ व २ साठी शिष्यवृत्ती अर्जासोबत दोन फोटो, टीसी, मार्कमेमो, जातीचे प्रमाणपत्र यांची एक सत्यप्रत व उत्पन्नाचे तहसीलदाराने प्रमाणित केलेले मुळ प्रमाणपत्र सादर करावे.

२) शिष्यवृत्ती क्रमांक ३ ते १२ पर्यंतच्या शिष्यवृत्तीसाठी गुणपत्रकाची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

३) उपरोक्त शिष्यवृत्तीचा लाभ नियमित उपस्थिती, चांगली वर्तणूक व समाधानकारक प्रगती दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांनाच होवू शकतो.

## १६. पारितोषिके

१२वी कला, वाणिज्य व विज्ञान या प्रत्येक शाखेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रू.१०००/– पारितोषिक ज्ञानोपासक महाविद्यालयातर्फे देण्यात येईल.

## १७. शिक्षकवृंद

**मराठी विभाग**

१. प्रा. घोडके व्ही.डी., उपप्राचार्य (एम.ए.,बी.एड.)
२. प्रा. श्रीमती सपकाळ के.एन. (एम.ए.,बी.एड.)
३. प्रा. श्रीमती दुधगांवकर बी.बी. (एम.ए.,बी.एड.)

**हिंदी विभाग**

१. प्रा. नालटे व्ही.पी. (एम.ए.,बी.एड.)
२. प्रा. धोत्रे एस.के. (एम.ए.,बी.एड.)

**इंग्रजी विभाग**

१. प्रा. मनवर आर.एम. (एम.ए.,बी.एड.)
२. प्रा. काळे ए.आर. (एम.ए.,बी.एड.)
३. प्रा. श्रीमती मराठे एम.पी. (एम.ए.,एम.एड.)

**उर्दू विभाग**

१. प्रा. सय्यद यू.क्यू. (एम.ए.,बी.एड.)

**संस्कृत विभाग**

१. प्रा. नेळगे आर.एस. (एम.ए.,एम.फील.,बी.एड.)
२. प्रा. श्रीमती कदम आर.जी. (एम.ए.,बी.एड.)

**राज्यशास्त्र विभाग**

१. प्रा. अपशेट्टी आर.व्ही. (एम.ए.,बी.एड.)

**अर्थशास्त्र/सहकार विभाग**

१. प्रा. राऊत के.एस. (एम.ए.,बी.एड.)

**मानसशास्त्र विभाग**

१. प्रा.डॉ. पडघन एस.आर. (एम.ए.,बी.एड.,पी.एचडी.)

**समाजशास्त्र विभाग**

१. प्रा. राऊत ए.ए. (एम.ए.,एम.फिल,बी.एड.)

**इतिहास विभाग**

१. प्रा. भोसले डब्लू.बी. (एम.ए.,बी.एड.,एम.फिल)

**वाणिज्य विभाग**

१. प्रा.डॉ. जोंधळे बी.जी.
(एम.कॉम.,बी.एड.,डी.बी.एम.,जी.डी.सी. अँड ए.,पीएच.डी.)
२. प्रा.डॉ. राऊत व्ही.एम.
(एम.कॉम.,बी.एड.,पीएच.डी.)

**गणित विभाग**

१. प्रा. रब्बेवार व्ही.एन. (एम.एस्सी,बी.एड.)
२. प्रा. पारवे एस.पी. (एम.एस्सी,बी.एड.)

**संगणकशास्त्र/माहिती तंत्रज्ञान विभाग**

१. प्रा. खान एस.यु. (एम.एस्सी.,बी.एड.)

# शिक्षक वृंद

**पदार्थ विज्ञान विभाग**

१. प्रा. माकू सी.पी. (एम.एस्सी.,बी.एड.)
२. प्रा. क्षत्रिय एस.पी. (एम.एस्सी.,बी.एड.)
३. प्रा. जैस्वाल एस.आर. (एम.एस्सी.,बी.एड.)
४. प्रा. बनसोडे एल.पी. (एम.एस्सी.,बी.एड.)
५. प्रा. जाधव एस.एन. (एम.एस्सी.,बी.एड.)

**रसायनशास्त्र विभाग**

१. प्रा. शिंदे ए.एल. (एम.एस्सी,बी.एड.)
२. प्रा. धानोरकर ए.डी. (एम.एस्सी,बी.एड.)
३. प्रा. काकडे डी.बी. (एम.एस्सी,बी.एड.)
४. प्रा. वावळे एस.जी. (एम.एस्सी,बी.एड.)
५. प्रा. श्रीमती कदम सी.डी. (एम.एस्सी,बी.एड.)

**जीवशास्त्र विभाग**

१. प्रा.डॉ. श्रीमती पाटील जे.यु. (एम.एस्सी,बी.एड.,पीएच.डी.)
२. प्रा. श्रीमती रेंगे ए.बी. (एम.एस्सी,बी.एड.)
३. प्रा.डॉ. श्रीमती रोडगे एस.व्ही. (एम.एस्सी,बी.एड.,पीएच.डी.)
४. प्रा. पवार डी.एच. (एम.एस्सी,बी.एड.)
५. प्रा. तिडके एम.आर. (एम.एस्सी,बी.एड.)
६. प्रा. श्रीमती पारवे पी.एस. (एम.एस्सी,बी.एड.)

**भूगर्भशास्त्र विभाग**

१. प्रा. श्रीमती घाटगे आर.एस. (एम.एस्सी.,बी.एड.)

**क्रीडा विभाग**

**कृषि विज्ञान व तंत्रज्ञान विभाग**

१. प्रा. तौर ए.जी. (एम.एस्सी.ॲग्री,बी.एड.)

## व्यावसायिक अभ्यासक्रम

**इलेक्ट्रॉनिक्स विभाग**

१. प्रा. पाटील व्ही.टी. (डी.आय.ई)
२. प्रा. सरकटे एस.जे. (बी.ई.)

**पीकशास्त्र विभाग**

१. प्रा. तौर ए.जी. (एम.एस्सी. ॲग्री,बी.एड.)

## १८. महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी :

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सावंत जी. टी. | वरिष्ठ लिपीक |
| २. | श्री. पारवे एस. डी. | वरिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. शिंदे जी. एस. | कनिष्ठ लिपीक |

## ग्रंथालय व प्रयोगशाळा कर्मचारी वर्ग

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पवार जी.आर. | सहायक ग्रंथपाल |
| २. | श्री. शिंदे जी.आर. | ग्रंथालय लिपीक |
| ३. | श्री. केळकर पी.आर. | ग्रंथालय लिपीक |
| ४. | श्री. जाधव व्हि.आय. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ५. | श्री. चव्हाण एम.बी. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ६. | श्री. सुकने डि.एस. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ७. | श्री. गव्हाणे एस. आर. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ८. | श्री. राऊत एम. जी. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ९. | श्री. बोराडे डी. एन. | प्रयोगशाळा सहाय्यक |

# शिक्षकेत्तर कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ठोसरे एन.जी. | ग्रं. परिचर |
| २. | श्री. शिंदे आर.डी. | ग्रं. परिचर |
| ३. | श्री. सामाले ए.डी. | ग्रं. परिचर |
| ४. | श्री. यन्नावार एस.बी. | ग्रं. परिचर |
| ५. | श्री. कदम आर.आर. | ग्रं. परिचर |
| ६. | श्री. मुटकुळे जी.पी. | प्र. परिचर |
| ७. | श्री. बोराडे के.के. | प्र. परिचर |
| ८. | श्री. सोनवणे ए.व्ही. | प्र. परिचर |
| ९. | श्री. भोसले पी.एन. | प्र. परिचर |
| १०. | श्री. खंदारे ए.एम. | प्र. परिचर |
| ११. | श्री. रिडला एस.एस. | प्र. परिचर |
| १२. | श्री. सूर्ये आर.एल. | प्र. परिचर |
| १३. | श्री. शेख मुसा | प्र. परिचर |
| १४. | श्री. शेगुकर एस.जी. | प्र. परिचर |
| १५. | श्री. भेंडेकर एच.एस. | प्र. परिचर |
| १६. | श्री. जाधव जी.डी. | प्र. परिचर |
| १७. | श्री. पंचांगे बी.एस. | प्र. परिचर |
| १८. | श्री. भंटवाड एस.बी. | प्र. परिचर |
| १९. | श्री. पंचांगे एम.एस | प्र. परिचर |
| २०. | श्री. कदम व्हि.के. | प्र. परिचर |
| २१. | श्रीमती देशमुख एस.आर. | प्र. परिचर |
| २२. | श्रीमती जाधव डी.एस. | प्र. परिचर |
| २३. | श्री. गारुडी एस.डी. | प्र. परिचर |
| २४. | श्री. सोळंके ए.एस. | प्र. परिचर |
| २५. | श्री. नानेकर आर.एस. | प्र. परिचर |
| २६. | श्री. उफाडे डि.ए. | प्र. परिचर |
| २७. | श्री. उन्हाळे जि. एम. | प्र. परिचर |
| २८. | श्री. वाघ एस.आर. | प्र. परिचर |
| २९. | श्री. भवाळ डी.बी. | प्र. परिचर |
| ३०. | श्री. येस्कर पी.बी. | सेवक |
| ३१. | श्री. गारूडी एच.एस. | सेवक |
| ३२. | श्री. राऊत डी.एस. | सेवक |
| ३३. | श्री. दुधगावकर जी.बी. | सेवक |
| ३४. | श्री. गरुड पी.टी. | सेवक |
| ३५. | श्री. कदम आर.एस. | सेवक |
| ३६. | श्रीमती जंगम व्ही.एन. | सेविका |
| ३७. | श्रीमती सोनटक्के एम.एस. | सेविका |

## उच्च माध्यमिक प्रमाण पत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४



कु. सायली सुनील शिंदे कला शाखेत प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल विद्यार्थीनी व पालकांचा सत्कार करतांना उपप्राचार्य व प्राध्यापक

### कला शाखेतील गुणानुक्रमे प्रथम पाच

| अनु.क्र | विद्यार्थांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | सायली सुनील शिंदे | **87.50 %** |
| २. | प्रतिक्षा रामा पिठले | **86.67 %** |
| ३. | विरभद्र बालाजी सिरगोळे | **84.67 %** |
| ४. | अनुष्का प्रताप देशमुख | **81.67 %** |
| ५. | अनुष्का ज्ञानोबा सुर्यवंशी | **79.33 %** |

## उच्च माध्यमिक प्रमाण पत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४



कु. गायत्री गौतम शंखला वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल विद्यार्थीनी व पालकांचा सत्कार करतांना उपप्राचार्य व प्राध्यापक

### वाणिज्य शाखेतील गुणानुक्रमे प्रथम पाच

| अनु.क्र | विद्यार्थांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | गायत्री गौतम शंखला | **94.50 %** |
| २. | स्नेहा शामराव मेटे | **91.33 %** |
| ३. | अयोध्या नारायण कदम | **88.33 %** |
| ४. | अनुजा नारायण भुमरे | **88.00 %** |
| ५. | ज्ञानेश्वर पांडुरंग सिरसाट | **85.67 %** |

## उच्च माध्यमिक प्रमाण पत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४



चि. प्रशांत गणेश काळे विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल विद्यार्थी व पालकांचा सत्कार करतांना उपप्राचार्य व प्राध्यापक

### विज्ञान शाखेतील गुणानुक्रमे प्रथम पाच

| अनु.क्र | विद्यार्थांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | प्रशांत गणेश काळे | **91.33 %** |
| २. | प्रतिक्षा राजेश्वर खिस्ते | **87.83 %** |
| ३. | श्रुती मनोहर हानेगावकर | **87.17 %** |
| ४. | ओम सुधीर फुटाणे | **86.50 %** |
| ५. | अमित रामेश्वर ननेकर | **85.00 %** |

# उच्च माध्यमिक प्रमाण पत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४

**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Voc.) शाखेतील गुणानुक्रम**

| अनु.क्र | विद्यार्थांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | विजय संजय आमले | **64.67 %** |
| २. | प्रसिक प्रकाश नरवाडे | **63.17 %** |
| ३. | नारायण ज्ञानोबा दशरथे | **60.00 %** |

## एच.एस.सी २०२४ निकाल

| अनु.क्र | शाखा | निकाल (टक्केवारी) |
|---|---|---|
| १. | विज्ञान | 98.88 % |
| २. | वाणिज्य | 95.08 % |
| ३. | कला | 74.35 % |
| ४. | एच.एस.सी. व्होकेशनल | 90.90 % |
| | **एकुण माहाविद्यालयाचा निकाल** | **91.98 %** |

# महाविद्यालयीन विविध उपक्रम




वृक्षारोपण करतांना संस्थाध्यक्ष प्राध्यापक व रा.से.यो. चे स्वयंसेवक



स्नेह सम्मेलन क्रीडा स्पर्धा २०२४




बीड येथे पार पडलेल्या रग्बी स्पर्धेत विभागीय उपविजेता संघ
प्रशिक्षक प्रा. भालेराव, प्रा. पोले व उपप्राचार्य विजय घोडके



गणित प्रदर्शन प्रसंगी स्पर्धक



कार्यक्रम प्रसंगी एकाग्र विद्यार्थीनी



'पोरी जरा जपुन' कार्यक्रमाचे सादरीकरण
करतांना प्रा.सौ. विजया मारोतकर



१ मे २०२४ ध्वजारोहण प्रसंगी उपप्राचार्य तथा प्राध्यापकवृंद



शिवजयंती २०२४ प्रसंगी विद्यार्थीनी



जग प्रसिध्द लोणार सरोवर क्षेत्र भेट



रा.से. योजना शिबीरात श्रमदान करतांना
कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक



गुणवंत आपल्या भेटीला या उपक्रमात मनोगत व्यक्त करताना डॉ. सिध्दी जैसवाल व उपस्थित विद्यार्थी

## ACADEMIC EVOLUTION AT
### Dnyanopasak Shikshan Mandal's
### College of Arts, Commerce & Science, Parbhani

